**<u>एस.सी.सी क्र.३९६/२०२२</u>** **निशाणी क्र.४२**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०४**
मी शपथेवर कथन करतो की,

नाव – शिवाजी अशोक ढाकणे,

वय – ३७ वर्षे, व्यवसाय – पो कॉ १६९९ ,

नेमणुक – श्रीरापमूर शहर पोलीस स्टेशन, जि. अहमदनगर.

**<u>सदरचा जबाब व्ही.सी.द्वारे नोंदवण्यात आला.</u>**

(Witness is present at the video conferencing room at Shrirampur Court, Dist Ahmednagar. Witness deposed that in the said VC room, nobody except the witness is present)

**साक्षीदाराचा सरतपास सरकारी अभियोक्ता श्री. एस. एस. दराडे यांचे मार्फत –**

दिनांक २५/०७/२०२२ रोजी मी स्था. गुन्हे शाखा, अहमदनगर येथे पो कॉ म्हणून कार्यरत होतो. सदर दिवशी पो. नि. श्री. अनिल कटके यांचे आदेशानुसार शेवगाव पोलीस स्टे. हद्दीत मी, पो. ना. लोढे, पो. कॉ. चव्हाण, माने असे आम्ही खाजगी वाहनाने अवैध धंदयावर कारवाईकामी माहिती घेत असतांना पो ना लोढे यांना गुप्त बातमीदाराकडून बातमी मिळाली की, कैलास मोहन बांगर हा आपेगांव शिवारात, त्याचे राहत्या घराच्या आडोश्याला, अवैध गावठी हातभट्टी दारु जवळ बागळुन विक्री करत आहे व आता गेल्यास तो मिळनू येईल. त्यानंतर आम्ही तात्काळ शेवगांव पोलीस स्टेशनला येवून तेथून नेमणुकीचे पे. ना. घुगे यांना बातमीतील हकीगत सांगितल्याने, त्यांनी दोन पंचांना पोलीस ठाण्यात बोलावून घेतले व कारवाई कामी सोबत येण्याची विनंती केल्याने त्यांनी संमती दिल्यानंतर आम्ही पोलीस स्टाफ व दोन पंच असे बातमीतील नमूद ठिकाणी गेलो. तेथे नमूद ठिकाणाच्या आलीकडे काही अंतरावर वाहन थांबविले व पायी चालत असतांना आम्हाला एक इसम गावठी हातभट्टीची दारु बाळगतांना दिसला. आमची खात्री होताच आम्ही ८.०० वा. चे सुमरास, नमूद इसमास ताब्यात घेतले. त्यास त्याचे नाव गाव विचारले त्याने त्याचे नाव कैलास मोहन बांगर असल्याचे सांगितले. त्याला आमची व पंचांची ओळख सांगितली व त्याची झडती घेतली असता त्याचे ताब्यातून एका प्लास्टीक ३५ लिटरच्या कॅनमध्ये ३० लिटर गावठी हातभट्टीची तयार दारु, जिची किंमत अंदाजे रु. ३,०००/– मिळून आली. त्यानंतर सदरचा मुद्देमाल पंचांच्या समक्ष ताब्यात घेवून जप्त पंचनामा केला. त्यातील शॅम्पल बाटली रासायनिक तपासणीकामी राखुन ठेवून त्यावर पंचांच्या व पोलीसांच्या सहीचे लेबल लावले. मी आरोपी विरुध्द फिर्याद निशाणी क्र.३८ वरील दिली. आरोपीला पाहिल्यास मी ओळखु शकतो. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास आरोपी तर्फे विधिज्ञ श्री. एस. झेड. चव्हाण यांचे कडून –**

०२. छापा मारला त्यावेळी मी स्थानिक गुन्हे शाखा येथे कार्यरत होतो. तेथे मी २०१९ ते मे २०२५ पावेतो स्था. गु. शाखा येथे कार्यरत होतो. छापा टाकण्यापूर्वी आम्ही गुप्तहेर विशांतर करुन घटना ठिकाणी पाठविला नव्हता. छापा टाकण्याकरीता ज्या वाहनाने गेलो होतो त्याचा क्रमांक मला सांगता येणार नाही. छापा टाकण्याकरीता आम्हाला कागदोपत्री आदेश नव्हता. घटनास्थळाच्या चतुःसिमा मला सांगता येणार नाही. घटनास्थळावरील घर कोणाच्या मालकीचे होते या बाबत कागदोपत्री शहानिशा केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावर जातांना मध्ये अनेक गावे लागले. हे म्हणणे खरे नाही की, त्या अनेक गावांमध्ये दारु विक्री होत होती. हे म्हणणे खरे नाही की, सदरची दारु सहजासहजी कोणालाही उपलब्ध होते. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा पोलीस ठाण्यात बसून तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला वरिष्ठांनी दिलेले टार्गेट पूर्ण करण्याकरीता प्रस्तुतची खोटी केस दाखल केली. मी घटनास्थळाच्या आसपासचे साक्षीदारांचा जबाब नोंदविला नव्हता. खाजगी वाहन घटनास्थळापासुन १०० ते २०० फुट अंतरावर लावले होते. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगण्यावरुन आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

श्रवणोत्तर स्विकृत,

VAISHALI SANJAY MORE
Digitally signed by VAISHALI SANJAY MORE
Date: 2025.09.09 16:11:24 +0530

दिनांकः– ०९/०९/२०२५

(वैशाली स. मोरे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.०२), शेवगांव